- 3 OCT 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महात्मा गांधी, लाल बहादूर शास्त्री यांना अभिवादन

## शहरातील शाळा, महाविद्यालयात विविध कार्यक्रम : भाषण, स्वच्छता अभियानचे आयोजन

**प्रतिनिधी**
**कोल्हापूर**

विविध संस्था, संघटनांकडून महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. भाषण, स्वच्छता मोहिम आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**शिवाजी विद्यापीठ**

महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनानिमित्त सामूहिक शपथ घेण्यात आली. यावेळी अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. जगदीश सपकाळे, गांधी अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रविंद्र भणगे, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. नेहा वाडकर, डॉ. जयश्री कांबळे, दौलत नांद्रे आदी उपस्थित होते.




कोल्हापूर : महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत डॉ. सरिता ठकार, डॉ. जगदीश सपकाळे, डॉ. प्रकाश पवार, तानाजी चौगुले, डॉ. रविंद्र भंगणे आदी.

- 3 OCT 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खाऊ गल्लीत दोन टन कचरा संकलन

## विद्यापीठातर्फे आयोजित मोहिमेस प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्य शासनाने रविवारी 'स्वच्छता ही सेवा' या उपक्रमांतर्गत आयोजित केलेल्या 'एक तारीख, एक घंटा' ही स्वच्छता मोहिम शिवाजी विद्यापीठामार्फत राबविण्यात आली. यावेळी खाऊ गल्लीत दोन टन कचरा संकलन करण्यात आला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व राजाराम महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी खाऊ गल्ली परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. मोहिमेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह सर्व वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले.**

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली केवळ विद्यापीठ परिसरच नव्हे तर विद्यापीठ परिसराबाहेरील शासकीय तंत्रनिकेतनपर्यंतचा परिसर स्वच्छ करण्यात आला.

विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग व राजाराम महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी डॉ. आप्पासाहेब पवार चौकापासून ते शासकीय तंत्रनिकेतन या जुन्या राष्ट्रीय महामार्गावरील टप्प्यात नव्याने निर्माण झालेल्या खाऊ गल्ली परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. मोहिमेत कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगुले आदींनी सहभाग घेतला. महापालिकेचे आरोग्य निरीक्षक सुशांत तावडे कर्मचाऱ्यांसह उपस्थित होते. खाऊ गल्लीतील टाकाऊ अन्न पदार्थ यांच्यासह रस्त्याकडेला उगवलेली काटेरी झुडपे व अन्य कचरा गोळा करण्यात आला. दोन टिप्पर भरून सुमारे दोन टन कचरा परिसरातून उचलण्यात आला.

लोकमत

# राजाराम महाविद्यालय परिसराची 'स्वच्छता'

कोल्हापूर : येथील राजाराम महाविद्यालयाच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. यामध्ये महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी आणि प्राध्यापक सहभागी झाले. त्यानंतर केएसबीपीपासून गव्हर्न्मेंट पॉलिटेक्निकपर्यंतच्या रस्त्याचीही स्वच्छता शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि राजाराम महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने केली. याप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव व्ही. एन. शिंदे, टी. एम. चौगुले, डॉ. एस. ए. सोनवणे, डॉ. ज्योती चव्हाण आणि कॅप्टन डॉ. बी. डी. भोसले यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यानंतर राजाराम महाविद्यालय येथे स्वच्छता शपथ घेण्यात आली. याप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. एन. शिंदे व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वाय. सी. आत्तार, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमास आयुक्त के. मंजुलक्ष्मी यांनीही भेट दिली.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते मुख्य प्रशासकीय भवनात त्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. राजर्षी शाहू सभागृहाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनानिमित्त सामूहिक शपथही घेण्यात आली. यावेळी अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. जगदीश सपकाळे, गांधी अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रवींद्र भणगे, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. नेहा वाडकर, डॉ. जयश्री कांबळे, दौलत नांद्रे यांच्यासह संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते मुख्य प्रशासकीय भवनात महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमापूजन करण्यात आले. याप्रसंगी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनानिमित्त सामूहिक शपथही घेण्यात आली. यावेळी अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. जगदीश सपकाळे, गांधी अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रवींद्र भणगे, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. नेहा वाडकर, डॉ. जयश्री कांबळे, दौलत नांद्रे यांच्यासह संशोधक विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ

येथे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते प्रशासकीय भवनात महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन केले. राजर्षी शाहू सभागृहाच्या प्रांगणात सामूहिक शपथही घेतली. अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. जगदीश सपकाळे, गांधी अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रवींद्र भणगे, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. नेहा वाडकर, डॉ. जयश्री कांबळे, दौलत नांद्रेसह विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी



कोल्हापूर : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. डॉ. टी. शिर्के. सोबत ॲड. के. ए. कापसे, माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, एम. बी. गरगटे, प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे आदी.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण लवचिक, सर्वसमावेशक होईल

## कुलगुरू डॉ. शिर्के; 'महावीर'मध्ये राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

व्यावसायिक शिक्षणाबरोबरच कौशल्याधारित रोजगाराभिमुख शिक्षणासाठी शिक्षण संस्थांनी व अध्यापनासाठी शिक्षकांनी स्वतःच्या मानसिकतेत बदल घडविणे आवश्यक आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण हे सर्वांगीण, लवचिक व सर्वसमावेशक होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. टी. शिर्के यांनी केले.

महावीर महाविद्यालय व ऑल इंडिया कॉलेज प्रिन्सिपल असोसिएशन यांच्या सहकार्याने आयोजित 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : संधी व आव्हाने' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्र कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्षस्थानी ॲड. के. ए. कापसे होते. यावेळी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी कक्ष सुकाणू समिती अध्यक्ष, माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, संस्थेचे सचिव एम. बी. गरगटे उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, शैक्षणिक धोरणामुळे बहुशाखीय दृष्टिकोनाद्वारे प्रोत्साहन मिळून संशोधनामध्ये नवोपक्रमाला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाच्या पलीकडे जाऊन भारतातील शिक्षणामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडेल.माजी कुलगुरू करमळकर म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरण स्वीकारून ते उत्तम पद्धतीने त्याची अंमलबजावणी करण्यासाठी दृष्टिकोन बदलला पाहिजे. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. अजितकुमार चौगले यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. कल्पना गंगातीरकर यांनी केले. डॉ. संजय ओमासे यांनी आभार मानले.

- 3 OCT 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# औषधी रानभाज्या देशाची अनमोल संपत्ती

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : दीडशेहून अधिक औषधी रानभाज्यांचा महोत्सव पाहण्यासाठी गर्दी



कोल्हापूर : रानभाज्या प्रदर्शनाचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत कल्पना सावंत, मंजिरी कपडेकर, उपवनसंरक्षक गुरुप्रसाद, डॉ. मधूकर बाचुळकर, डॉ. अशोक वाली, मिलिंद धोंड, अमृता वासुदेवन, सुशांत टक्कळकी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

निसर्ग म्हणजे पृथ्वीवरचा समृध्द ठेवा आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगासह कोकणातील जंगलात नैसर्गीकरित्या उगवणाऱ्या औषधी रानभाज्या म्हणजे देशाची अनमोल संपत्ती आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

कॅम्पॅशन २४, वुई केअर कोल्हापूर, निसर्ग अंकुर, गार्डन क्लब, युथ ऍनिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रानभाज्या महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. जैन बोर्डीगमध्ये सुरू असलेल्या रानभाज्या महोत्सवात दीडशेहून अधिक रानभाज्या उपलब्ध आहेत. कोल्हापूर वनविभागाचे उपवनसंरक्षक गुरु प्रसाद यांनी वन्यजीव सप्ताहा दरम्यान स्तुत्य पक्रम कौतुकास्पद असल्याचे सांगितले. प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी मिलिंद धोंड, डॉ. मधुकर बाचुळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

ावून पुढच्या पिढीस माहिती करून द्यावी. यावेळी निसर्ग अंकुरचे डॉ. अशोक वाली, मंजिरी कपडेकर, सुशांत टक्कळकी, कल्पना सावंत, पल्लवी कुलकर्णी, अभिजित पाटील, अमृता वासुदेवन आदी उपस्थित होते.

गारंबी, गर्दळीची चार फुटी शेंग, टेटूची तलवारीसारखी दोन फुटी शेंग, खाजकुहीलीचा, शेरणी, चन्नीचे, सोनार वेल, कांद्याचित्रक, कडवी अमरकंद, नळीची भाजी, समुद्रशोक, नीरफणस, करंजा, चिवरकेळ, केळफूल, निवडूंग, पातर, तेरडा, कामुनी, करंदा, सकाळू, तीनतोंडी, मांजरी, करशिंगी, पपनस, सफेद मुसळा, काटवलं, दिंडा, कुडा, आंबुशी, पाथरी, कुरडू, शेवगा, बांबू कोंब, आंबट चुका, केना, कपाळफोडी, आघाडा, घोळभाजी, टाकाळा, भुई आवळा यासारख्या अनेक औषधी वनस्पतींचा जणू मेलाच भरला आहे. वृक्षप्रेमी मोहन माने यांच्या पुढाकाराने अनेक रानभाज्यांची बियाणे आणि तरू वापरून रोपे तयार केली आहेत.

रानभाज्यांची चव चाखता यावी म्हणून खाद्यपदार्थांचे स्टॉल्स उभारले आहेत. या स्टॉलवर नाचणी, तांदळाची भाकरी, खरडा, रानभाज्यांची आमटी, आगाडा, शेवगा, आळू लोणच, चटणी, केण्याची भजी, वडे आणि डोसा येथे उपलब्ध आहे.

### आज पाककृती स्पर्धा

प्रदर्शनस्थळी ५० रानभाज्या बनवण्याचे प्रात्यक्षिक आणि पाककृती (शहरी व ग्रामीण विभाग) स्पर्धेचे आयोजन केले आहे. विजेत्यांना रोख पारितोषिक आणि सन्मानपत्र देवून सन्मान केला जाईल. सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत हे प्रदर्शन सुरु राहणार आहे, अशी माहिती मिलिंद धोंड यांनी दिली.

# लोककलेत विवेकानंद, लोकनृत्यात कदम कॉलेज प्रथम

## मुरगूड येथे शिवाजी विद्यापीठाचा युवा महोत्सव

मुरगूड : पुढारी वृत्तसेवा

येथील मंडलिक महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित ४३ व्या कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सवात लोककला स्पर्धेत कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने प्रथम क्रमांक मिळविला तर लोकनृत्य प्रकारात इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला.

जिल्हा युवा महोत्सवात एकूण १५ कला प्रकारच्या स्पर्धांचा समावेश होता. त्याचा निकाल असा - लोककलेत दुसरा क्रमांक श्रीमती आक्काताई पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, तृतीय क्रमांक - देशभक्त रत्नापाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर, लोकनृत्यात दुसरा व तिसरा क्रमांक अनुक्रमे व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी व जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर.

**मूक नाट्य** - प्रथम भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, द्वितीय कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, तृतीय यशवंतराव चव्हाण महाविद्यालय वारणानगर. नकला स्पर्धेत - प्रथम डी. के. कॉलेज इचलकरंजी, द्वितीय भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, तृतीय डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग. मराठी वक्तृत्व प्रथम - न्यू कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - श्रीमती आक्काताई पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, तृतीय - डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर. हिंदी वक्तृत्व प्रथम - न्यू कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, तृतीय - दूधसाखर महाविद्यालय बिद्री. इंग्रजी वक्तृत्व प्रथम - शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - केआयटी कॉलेज कोल्हापूर, तृतीय - जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर. वादविवाद प्रथम - दूधसाखर महाविद्यालय बिद्री, द्वितीय न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

**सुगम गायन** - प्रथम - सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, द्वितीय - देशभक्त रत्नाप्पाणा कुंभार, तृतीय - न्यू कॉलेज कोल्हापूर. लोकसंगीत वाद्यवृंद प्रथम - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय - व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी. लघुनाटिका स्पर्धा प्रथम - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय - कॉमर्स कॉलेज कोल्हापूर. एकांकिका प्रथम - देशभक्त रत्नापाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, द्वितीय - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, तृतीय - सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर. समूहगीत प्रथम - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - राजाराम कॉलेज कोल्हापूर, तृतीय - देशभक्त रत्नापाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर. पथनाट्य प्रथम - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - यशवंतराव चव्हाण महाविद्यालय हलकर्णी, तृतीय - दूधसाखर महाविद्यालय बिद्री. प्रश्नमंजुषा प्रथम - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - राजाराम कॉलेज कोल्हापूर. या विजेत्या स्पर्धकांची दि. ११ ते १३ ऑक्टोबरपर्यंत दहीवडी कॉलेज (जि. सातारा) येथे होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे.



मुरगूड : युवा महोत्सवात कला सादर करताना युवक व युवती.

## १५ कला प्रकारांचे सादरीकरण

मुरगूड : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग व सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मुरगूडमध्ये आयोजित जिल्हा युवा महोत्सवात १५ प्रकारच्या कलांचे बाराशे कलाकारांकडून सादरीकरण झाले.

कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२३-२४ सालाचा ४३ वा जिल्हा युवा महोत्सव येथील मंडलिक महाविद्यालयाच्या प्रांगणात लोकनेते सदाशिवराव मंडलिक रंगमंचावर सोमवारी पहाटेपर्यंत झाला. या महोत्सवात जिल्ह्यातील ७६ महाविद्यालयांतील १२०० कलाकारांचा समावेश होता.

महोत्सव यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार, उपप्राचार्य डॉ. टी. एम. पाटील, प्रा. डी. पी. साळुंखे, डॉ. शिवाजी होडगे, डॉ. उदय शिंदे, डॉ. अद्वैत जोशी आदींनी परिश्रम घेतले.

- 3 OCT 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## जिल्हास्तरीय युवा महोत्सव : लोकनृत्यात दत्ताजीराव कदम कॉलेज प्रथम

# लोककलेत विवेकानंद कॉलेज अव्वल

▸ सकाळ वृत्तसेवा

मुरगूड, ता. २ : येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ४३ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये विद्यार्थी कलाकारांनी आपला कलाविष्कार सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.

लोककलेमध्ये कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने, तर लोकनृत्य कलाप्रकारात इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स, कॉमर्स कॉलेजने प्रथम क्रमांक पटकावला. येथील मंडलिक महाविद्यालयाच्या लोकनेते सदाशिवराव मंडलिक सांस्कृतिक मंचच्या भव्य सभागृहामध्ये झालेल्या या युवा महोत्सवात कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ७६ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी १४ कला प्रकारामध्ये सहभाग नोंदवला.

महोत्सवातील विविध कलाप्रकारातील निकाल (अनुक्रमे) असा :

**लोककला :** विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर.

**लोकनृत्य :** दत्ताजीराव कदम आर्टस् सायन्स कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी, जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर.

**मूकनाट्य :** भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय वारणानगर.

**नकला :** दत्ताजीराव कदम आर्टस् सायन्स कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर.



मुरगूड : येथील मंडलिक महाविद्यालयाच्या प्रांगणात जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये लोककला सादर करताना महाविद्यालयीन युवती.

**मराठी वक्तृत्व :** न्यू कॉलेज कोल्हापूर, श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, डी.वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर.

**हिंदी वक्तृत्व :** न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, दूध साखर महाविद्यालय बिद्री.

**इंग्रजी वक्तृत्व:** शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, के.आय.टी.कॉलेज कोल्हापूर, जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर.

**वादविवाद :** दूध साखर महाविद्यालय बिद्री, न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

**सुगम गायन :** सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, न्यू कॉलेज कोल्हापूर.

**लोकसंगीत वाद्यवृंद :** विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज कोल्हापूर, व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी.

**लघुनाटिका :** विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज, रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स.

**एकांकिका :** रत्नापाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, विवेकानंद कॉलेज, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ

**समूहगीत :** विवेकानंद कॉलेज, राजाराम कॉलेज कोल्हापूर, रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स.

**पथनाट्य :** विवेकानंद कॉलेज, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय हलकर्णी आणि दूधसाखर महाविद्यालय बिद्री.

# विद्यापीठात शरण साहित्य अध्यासनासाठी तीन कोटींचा निधी उभारणार

- लिंगायत समाजाच्या बैठकीत निर्णय
- पहिल्या बैठकीत १५ लाखांचा निधी जमा
- दोन महिन्यांत १ कोटी संकलनाचे टार्गेट

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या १० मार्चला झालेल्या अधिसभेमध्ये शरण साहित्य अध्यासन स्थापन करण्याचा ठराव एकमताने मंजूर झाला आहे. तो अधिसभा सदस्य ॲड अभिषेक मिठारी यांनी मांडला होता. या अध्यासनासाठी लोकसहभागातून तीन कोटीचा निधी उभारण्याचा निर्धार लिंगायत समाजाने केला आहे. समाजाच्या अध्यासनासाठी झालेल्या यप पहिल्या बैठकीत १५ लाख रूपयाचा निधी जमा झाला आहे.

कोल्हापूर जिल्हा लिंगायत समाज संस्था, बसव केंद्र व शरण साहित्य अध्यासन शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने सौ. सरलाताई पाटील, राजशेखर तंबाके व ॲड अभिषेक मिठारी यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सोमवारी ही माहिती देण्यात आली. यावेळी विलास आंबोळे, सुभाष महाजन, चंद्रशेखर बटकडली, बाबूराव तारळी उपस्थित होते.



### समाजाच्या पहिल्या बैठकीत १५ लाख निधी जमा

शरण साहित्य अध्यासनासाठी पहिल्या बैठकीत १५ लाखांचा निधी जमा झाला. यामध्ये आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर, गणपतराव पाटील, बसवराज आजरी, चंद्रशेखर डोली, डॉ. विश्वनाथ मगदूम, गजानन सुलतानपुरे, मिलिंद साखरपे, सुर्यकांत पाटील-बुद्धीहाळकर, सुनील स्वामी, राजशेखर तंबाके, सरलाताई पाटील, विलास आंबोळे, सुभाष महाजन आदींनी हा निधी दिला.

### शरण साहित्य अध्यासनातून होणारे कार्य

- अध्ययन, अध्यापन, संशोधन होणार
- कन्नड, इंग्रजीतील शरण साहित्याचे मराठीत भाषांतर
- नवीन पिढीसाठी बसवण्णांचे महत्व पटवण्यासाठी व्याख्याने, चर्चासत्र, शिबिरे
- शरण व वाचन साहित्यासाठी अद्ययावत ग्रंथालय
- ग्रंथ, स्मरणिका, नियतकालिके प्रकाशित केली जाणार.
- ऐतिहासिक वारसा स्थळ, जतन, संवर्धनासाठी उपक्रम
- शरण साहित्याचा प्रचार, प्रसार केला जाणार
- बसवण्णा व शरणांनी मांडलेले लिंगायत तत्वज्ञान संस्कृतीचे संशोधन
- शरण साहित्यावर शैक्षणिक अभ्यासक्रम सुरू होणार
- संशोधन व उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृती मिळणार
- शरण साहित्यावर ऑनलाईन कोर्सेस सुरू करणार

सरलाताई पाटील म्हणाल्या, शरण साहित्य अध्यासनाचा प्रस्ताव मंजूर झाला आहे. अध्यासनासाठी आठ कोटींची गरज आहेत. पहिल्या टप्प्यात तीन कोटी रूपये निधी लोकसहभागातून जमा करण्याचा निर्णय घेतला आहे.

दोन महिन्यांत एक कोटी रूपये निधी संकलित करण्यात येणार आहे. यासाठी लिंगायत समाज संस्थेच्यावतीने शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील तिन्ही जिल्ह्यांतील प्रतिनिधींची बैठक रविवारी वीरशैव को ऑपरेटिव्ह बँकेमध्ये झाली. या पहिल्या बैठकीत चांगला प्रतिसाद मिळाल्याने, १५ लाखांचा निधी जमा झाल्याचे त्यांनी सांगितले.

### शरण साहित्य म्हणजे काय ?

बाराव्या शतकात युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर आणि ७७० शरण-शरणींनी समाजक्रांती केली होती. त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनाद्वारे समग्र परिवर्तनाकरी मूल्य असणाऱ्या साहित्याची निर्मिती केली गेली. यालाच शरण साहित्य म्हटले जाते. शरण साहित्यातून मांडलेले विचार हे भगवान महावीर, आणि गौतम बुध्द यांच्या विचाराशी नाते सांगणारे आहे. राज्यातील वारकरी चळवळ व महानुभव पंथाशी अनुबंध जोडणारे आहे. हा वैचारिक वारसा आधुनिक काळात अनेक समाजसुधारक आणि सत्यशोधकांनी पुढे चालवला आहे.